Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0014

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

# दुष्काळाचा बालकांवर परिणाम आणि समाजकार्य आंतरनिरसन

**डॉ. अनिल आनंद सरगर**, सहयोगी प्राध्यापक
बी.पी. नॅशनल इन्टिटयूट ऑफ सोशल वर्क,
हनुमाननगर नागपूर–४४०००९.
इमेलःanilsargar01@gmail.com,
मो. ८४२१९३६३४२

**Abstract:**

भुख आणि दुष्काळामुळे होणारे कुटुंबाचे स्थलांतरण ही अलिकडची एक मोठी समस्या समाजापुढील आव्हान आहे. महाराष्ट्रात २४ जिल्हयात यंदा पाऊस कमी झाला. काही ठिकाणी ओला तर काही ठिकाणी सुखा दुष्काळाची परिस्थिती उद्‌भवली. त्यामुळे भिषण दुष्काळाचा सामना करावा लागल्याने मोठया प्रमाणावर कुटुंबाचे स्थलांतरण शहरी भागाकडे झाले. या सर्व पस्थितीचा सर्वाधिक फटका बसतो तो लहान मुलांना. रस्त्याच्या कडेला भिखाऱ्यांच्या संसारासारखे स्थलांतरित शेतकरी आणि शेतमजुरांना संसार मांडावा लागतो. या कुटुबानां रोजगाराचा, जेवणाचा, पाण्याचा, शौचालयाचा जसा प्रश्न जसा सतावतो तसाच प्रश्न असतो मुलांच्या संगोपनाचा, शिक्षणाचा, संस्काराचा आणि सुरक्षेचाही. त्यांच्या जीवनात आलेल्या या आणिबाणीमध्ये त्यांना अनेक असहनीय यातनांना तोंड द्यावे लागले. अशा मुलांबाबत शासनाच्या नियोजनशुन्य नीतीमुळे त्यांचे अतोनात हाल होतात. या शोधनिबंधाच्या माध्यमातून या दुष्काळग्रस्त स्थलांतरित मुलांच्या मुलभुत, आर्थिक व शैक्षणिक अधिकारांचा तसेच अन्य परिस्थितीचा बाल अधिकारांच्या अनुषंगाने आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. दुष्काळाच्या काळात व वर्तमान आर्थिक व सामाजिक संरचनेत त्यांना कोणत्या प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते आणि त्यांना कोणत्या सामाजिक संरक्षणाची, साधनांची, तंत्राची आणि नीतीची गरज आहे यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

**Keywords:** दुष्काळ, दुष्काळग्रस्त स्थलांतरित मुले, विस्थापन आणि समाजकार्य आंतरनिरसन

**प्रस्तावना:**

दुष्काळ हा नैसर्गिक हवामान चक्रातील दिर्घकाळ कोरडा काळ आहे, जो जगात कुठेही येऊ शकतो. ही एक संथ सुरू होणारी आपत्ती आहे जी पर्जन्यवृष्टीच्या अभावाने निर्माण होते. ज्यामुळे पाण्याची कमतरता होवुन तुटवडा निर्माण होतो. दुष्काळ हा स्थानिक अर्थव्यवस्थेला नुकसान व धोका पोहचविते. ( हिस्डॉल आणि टालास्केन ,२०००) दुष्काळाची सर्वमान्य व स्विकार्य अशी व्याख्या नाही. तशी स्वतंत्र व्याख्या तयार करण्याची गरज आहे. (विल्हिट आणि ग्लॅण्डस,१९८५) पाण्याच्या टंचाईमुळे जगातील ४० टक्के लोकांवर गभीर संकट ओढवते. याच अंदाजानुसार २०३० पर्यंत दुष्काळामुळे सुमारे ७०० दशलक्ष लोक विस्थापित होण्याची भिती व्यक्त करण्यात आली आहे. हवामान बदलामुळे निरंतर तापमानात वाढ होत आहे. त्यामुळे कोरडे प्रदेश निर्माण होत आहेत. तसेच अतिवृष्टीमुळेही ओल्या दुष्काळाचा धोका वाढला आहे. वृक्ष कापल्यामुळे मोठया प्रमाणावर तापमान वाढले आणि परिणामी पाण्याचे बाष्पीभवन लवकर होत असल्याने दुष्काळाचा धोका आणि त्याचा कालावधी निरंतर वाढत आहे. (१९७९) भारतीय हवामान विभागाने दुष्काळाची व्याख्या करताना ''कोणत्याही भागात उद्‌भवणारी अशी परिस्थिती जेव्हा सरासरी वार्षिक पाऊस सामान्य पावसाच्या ७५ टक्क्यांपेक्षा कमी असतो'' त्याला दुष्काळ म्हटलेले आहे.

भारतामध्ये दुष्काळप्रवण क्षेत्र १९९७ पासून ५७ टक्क्यांनी वाढले आहे. २०२० ते २०२२ या काळात दुष्काळग्रस्त भागातील लोकांच्या जीवनाची गुणवत्ता कमालीची ढासळली आहे. शेतकरी आणि शेतमजुरांसाठी ती धोकादायक ठरते. त्याचा परिणाम म्हणून ग्रामीण भागात पाण्याचे दुर्भिक्ष, पिके वाया जाणे, भुकबळी, कुपोषण, डिहायड्रेशन, त्याच्याशी संबंधित अन्य आजार वाढतात. सोबतच मोठया प्रमाणावर स्थलांतरण आणि परिणामी देशाअंतर्गत विस्थापन व शरणार्थी जीवन जगण्याची पाळी येते. त्यातूनच सामाजिक असंतोष तसेच नैसर्गिक संसाधनांवरून आपसातील व सामुदायिक भांडणे सुध्दा वाढतात. महाराष्ट्रातील जवळपास ६१ टक्के भाग दुष्काळ प्रभावित आहे. सलग अनेक वर्षे दुष्काळचा सामना करणाऱ्या मराठवाडयातील एप्रिल, २०१७ मध्ये २९१ प्रकरणे नोंदवीली त्यापुर्वी च्या वर्षी हा आकडा ३७५ होता. महाराष्ट्रातील सर्वात जास्त फटका सोलापुर, अहमदनगर, सांगली,

सातारा, पुणे, बीड आणि नाशिक या जिल्हयांना बसला. धुळे, नंदुरबार जिल्हयामध्येही दुष्काळ सदृष्य स्थिती निर्माण झाली. या जिल्हयात पाऊस प्रचंड पडला. संपुर्ण जिल्हा दुष्काळी असताना सरकारने मात्र काही तालुक्यानाच सर्व्हेक्षणात समाविष्ट केले. अशा स्थितीचाही अनेक कुटुंबाना लाभ न मिळाल्याने त्यांचे नुकसान होते. महाराष्ट्रामध्ये ३१ आक्टोबर, २०१३ ला १८० तालुक्यात आधी दुष्काळ घोषित करण्यात आला. प्रत्यक्षात पिकाचे कोठे नुकसान झाले आहे त्यानुसार नवीन यादी १५१ तालुक्यात जाहीर केली. दुष्काळ व्यवस्थापन संहितेनुसार २०४ तालुक्यातील दुष्काळ दुर्लक्षीत केलेला आहे. दुष्काळ देखरेख समित्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे एकुण २६ जिल्हयातील ११२ तालुके गंभीर दुष्काळाचे तर मध्यम दुष्काळाचे ३९ तालुके शासननिर्णयात जाहीर केलेले आहेत.

मानवी स्थलांतर हे सामाजिक शास्त्रे आणि गरीबी विरोधातील प्राचीन कार्यक्रमाचा एक महत्वपुर्ण पैलु आहे. (गेलब्रेथ १९७९) विकसीत आणि विकसनशील देशांच्या स्थलांतरण प्रक्रीयेमध्ये फरक दिसून येतो. २०१० च्या शासकीय अहवालानुसार राज्यातील स्थलांतरित मजुरांमध्ये कष्टकरी व अंग मेहनत करणाऱ्या मजुरांचा आलेख वाढता आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालातील (२०२३) साख्यिंकीनुसार ३०,७०४ लोकं मरण पावले. ५६.८ दशलक्ष लोकांना अन्नाच्या तुटवडयाला तोंड द्यावे लागले. (ग्लोबल रिपोर्ट ऑन फुड क्रायसिस, ४ मे २०२३) जागतिक स्तरावर जवळपास ५५ दशलक्ष लोक दरवर्षी दुष्काळामुळे प्रभावित होतात. ते जगाच्या वेगवेगळया भागात पशुधन आणि विकासासाठी सर्वात गंभीर धोका आहेत. दुष्काळामुळे लोकांचे जीवनमान धोक्यात येते. रोग आणि मृत्युचा धोका वाढतो तसेच मोठया प्रमाणावर स्थलांतरण होते. दुष्काळाचा आरोग्य, शेती, अर्थव्यवस्था, उर्जा आणि पर्यावरणावर गंभीर परिणाम होतो. पाण्याची पातळी कमी झाल्याने शेती उत्पादन कमी होते त्यामुळे किमती वाढल्याने उपभोग घटते परिणाम त्यामुळे लाखो लोक दारिद्रयात जगण्यासाठी बाध्य झाले. युनायटेड नेशन्स कन्वेशन टु कॉम्बॅट डिसर्टिफिकेशन च्या अहवालामध्ये ग्रहांच्या प्रमाणात एक अभुतपुर्व आणीबाणी, जिथे मानव–प्रेरित दुष्काळाचे प्रचंड परिणाम केवळ उलगडू लागले आहेत. हा भारतातील एकंदर शहरीमानाच्या प्रक्रीयेत दडलेली ही आणखी एक महत्वाची विषमता आणि विरोधाभास आहे.

दुष्काळग्रस्त स्थलांतरित मुले गतीशील व संघर्षमय जीवन जगतात. सर्व मानव जन्मत: मुक्त, प्रतिष्ठा व हक्कांच्या बाबतीत समान असतात. (डी. बेट्स २००९) भारतीय संविधान व संयुक्त राष्ट्राचे घोषणापत्र तसेच आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटना यांच्या तत्वांप्रमाणे या दुष्काळग्रस्त स्थलांतरित मुलांना आदरयुक्त व मानवीय वागणुक दिल्या जायला हवी. त्याचा जगण्याचा, शिक्षणाचा हक्क, शारीरिक व आर्थिक सुरक्षितता, कौटुंबिक व सांस्कृतिक जीवन जगण्याचा हक्क तसेच शोषणापासून संरक्षणाचा अधिकार डावलल्या गेला. ते हिंसा, अन्याय व अत्याचाराला बळी पडले. जीवनावश्यक गरजांचा अभाव, हेळसांड, शिवाय अत्यंत अभावग्रस्त आणि रोगट वातावरणात जगणे व धोकादायक परिस्थितीत प्रवास करावा लागतो. दुष्काळग्रस्त स्थलांतरित मुले अन्नापासून वगळले जातात. अनेकदा उपासमारीमुळे अपुरे पोषण मिळते. त्यामुळे त्यांचे वजन झपाटयाने कमी होते. पुरेशा पोषणाअभावी अवयवांवर नकारात्मक परिणाम होतो. रोगप्रतिकारक शक्ती घटल्याने ते कोणत्याही आजाराला सहज बळी पडतात.

**अध्ययनाचे उद्देश:**

१. दुष्काळग्रस्त बालकांच्या वैयक्तिक व कौटुंबिक स्थितीचा अभ्यास करणे.
२. दुष्काळग्रस्त बालकांच्या आर्थिक व समाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
३. दुष्काळाचा बालकांच्या पोषणावर, आरोग्यावर आणि शिक्षणावर झालेला परिणाम अभ्यासणे.
४. दुष्काळाचा बालकांच्या सभोवतालच्या वातावरणात झालेल्या बदलाचा भावनिक स्थितीवर झालेला परिणाम अभ्यासणे.
५. दुष्काळग्रस्त बालकांना उपलब्ध झालेल्या शासकीय व गैरशासकीय मदतीचे विश्लेषण करणे.
६. दुष्काळग्रस्त बालकांच्या बदलत्या स्थितीला तोंड देण्यासाठी आवश्यक कार्यनीतीची चर्चा करणे.

**अध्ययन पध्दती:**

प्रस्तुत विषयावर अभ्यास करण्यापुर्वी या विषयाचे निट साहित्य परीक्षण करून अभ्यासाची योजना तयार केल्या गेली. दुष्काळग्रस्त स्थलांतरित मुलांचे हे विश्लेष्णात्मक अध्ययन असल्याने वर्णनात्मक आराखडा वापरल्या गेला. अभ्यासाकरीता गैरसंभाव्यता नमुना निवड तंत्राचा वापर केला असून नागपूर शहरातील विविध भागांमध्ये अन्य भागातून स्थलांतरित होऊन आलेल्या दुष्काळग्रस्त ६० बालकांची व कुटुंबाची निवड सोयिस्कर पध्दतीने करण्यात आली होती. तथ्य संकलनासाठी प्राथमिक पध्दतीमध्ये संरचित मुलाखती, निरिक्षण आणि बालकांसोबत फोकस समुह चर्चा तर दुय्यम

पध्दतीमध्ये वर्तमान पत्रातील बातम्या, ग्रंथ, पुस्तके इत्यादींचा वापर केला. संरचित मुलाखतीसाठी ४० प्रश्नांची अनुसुची तयार केली होती. तथ्य प्रक्रियनामध्ये संपादन, वर्गिकरण, संकेतन, मास्टर चार्ट इत्यादीचा वापर करून माहितीचे विश्लेषण व प्रस्तुतीकरण केले.

**अध्ययनाचे प्रमुख निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. दुष्काळग्रस्त कुटुंबातील स्थलांतरित बालकांमध्ये सर्वाधिक प्रमाण ५६.६७ टक्के १ ते ५ वर्षे वयोगटातील तर ४३.३३ टक्के ६ ते १० वर्षे वयोगटातील म्हणजे बालकांचे आहे.
२. दुष्काळग्रस्त कुटुंबातील मजुरांमध्ये सर्वाधिक प्रमाण ७१.६७ टक्के अनुसुचित जाती व जमातीचे असून त्यामध्येही पालक निरक्षर व प्राथमिक शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे.
३. दुष्काळग्रस्त कुटुंबांमध्ये सर्वाधिक प्रमाण ७६.६७ टक्के भुमीहिन असून त्यामध्येही दारिद्रय रेषेखालील असलेल्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे.
४. दुष्काळग्रस्त कुटुंबातील मजुरांच्या कुटुंबामध्ये सर्वाधिक ६८.३३ टक्के मजुरांकडे ३ लोक कमविते असूनही त्यांचे वार्षिक उत्पन्न ४१ ते ६० हजार रूपये एवढे जेमतेम आहे, ज्यातून त्यांच्या कौटुंबिक गरजाही निट भागत नाही.
५. सर्वाधिक ६६.६७ टक्के दुष्काळग्रस्त कुटुंबाच्या स्थलांतरणाचे मुळ कारण अन्न व पिण्याच्या पाण्याची अंपर्याप्तता आणि चांगल्या जीवनसंधीची प्राप्ती करणे आहे.
६. सर्वाधिक ६३.३३ टक्के दुष्काळग्रस्त कुटुंबातील अन्य प्रश्न म्हणजे जनावरांसाठी चारा नसणे, वापरण्यासाठी पर्याप्त पाणी नसणे, कर्जबाजारी झाल्याने कर्जाच्या परतफेडीची व्यवस्था करणे.
७. दुष्काळग्रस्त कुटुंबातील लोकांना गावात केवळ ४ ते ६ महिनेच रोजगार प्राप्त होतो अर्थात अर्धा वेळ ते बेरोजगार असतात. पाण्याच्या अभावामुळे शेतीत एकच पिक घेता येते.
८. दुष्काळग्रस्त कुटुंबातील बालकांचे पर्याप्त अन्न न मिळणे, गुणवत्तापुर्ण पिण्याच्या पाण्याचा अभाव, सतत आजारी असणे, स्वच्छता राखण्यामध्ये अडचणी येणे या १ ते ५ वर्षे वयोगटातील बालकांचे मुख्य प्रश्न असुन त्याचे एकुण प्रमाण ८१.६७ टक्के आहे.
९. दुष्काळग्रस्त कुटुंबातील बालकांचे पर्याप्त अन्न न मिळणे, गुणवत्तापुर्ण पिण्याच्या पाण्याचा अभाव, लहान मुलांना सांभाळणे, पाण्याची व्यवस्था करण्यात मदत करणे, शाळेत सतत गैरहजर राहणे, स्वच्छता राखण्यामध्ये अडचणी येणे या ६ ते १० वर्षे वयोगटातील बालकांचे मुख्य प्रश्न असुन त्याचे एकुण प्रमाण ८६.६७ टक्के होते.
१०. दुष्काळग्रस्त कुटुंबाचे दुष्काळामुळे उत्पन्नात घट झाली आणि त्यामुळे मुलांच्या शाळेची फी भरणे अशक्य झाल्याने मुलांना शाळेत पाठवणे कठीण झाले.
११. स्थलांतरित ठिकाणी मुलींना घर सांभाळण्याची जबाबदारी, घरगुती वापर व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे यामुळे ६६.६७ टक्के मुलींच्या शिक्षणात खंड पडलेला असुन बालकांच्या शिक्षणात खंड पडण्याचे मुख्य कारण मुळ गावी देखभाल/सांभाळ करण्यात येणाऱ्या अडचणी आहेत.
१२. स्थलांतरित ठिकाणी बालकांना पालकांसोबत कामाला जाणे ४६.६७ टक्के, भिक्षा मागणे २३.३३ टक्के प्रमाण आहे.
१३. स्थलांतरित ठिकाणी सुध्दा बालकांची शिकण्याची इच्छा असुन शिकवायला कोणी नसणे तसेच हंगामी शाळेची व्यवस्था नसणे हि ४६.६७ टक्के बालकांपुढे मोठी अडचण उद्भवते.
१४. दुष्काळग्रस्त कुटुंबाना दुष्काळाच्या काळात काम मिळवण्यासाठी किमान ५ ते ६ महिने रोजगारासाठी वणवण भटकावे लागले. तर ८६.६७ टक्के मजुरांना या काळात कोणतेही काम मिळाले नाही.
१५. दुष्काळग्रस्त कुटुंबातील दुष्काळाच्या काळात काम गमवावे लागणाऱ्यामध्ये महिलांचे प्रमाण अधिक ६६.६७ टक्के आहे. या काळात त्यांनी मुलांसह घरोघरी फिरून वस्तुरूपात कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी भिक्षा मागितली. तर उर्वरित कुटुंबांनी आपला उदरनिर्वाह बचतीच्या पैशातूनच केला.
१६. दुष्काळग्रस्त कुटुंबातील बालकांमध्ये काम करणाऱ्या गैरसरकारी संस्थांच्या वैद्यकीय माहितीनुसार बालकांमध्ये अन्न घेण्यात कमी, असंतुलित आहार, जीवनसत्वांचा अभाव, दुषित पाण्यामुळे डायरिया, पाणीजनित आजाराचे प्रमाण अधिक आढळले. याचे कारण मुलांच्या संगोपनाकडे आणि खानपानाकडे पालकांचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले.

१७. दुष्काळग्रस्त कुटुंबातील पालकांना घरी मागे राहिलेल्या गरोदर स्त्रिया, आजारी वृध्द आणि तरूण मुलांच्या काळजीचे टेन्शन असते.

१८. दुष्काळग्रस्त कुटुंबातील लोकांना नवीन गावातील लोक स्विकारित नाहीत. बालकांना लोकांच्या छळाचा सामना करावा लागतो. गावाच्या अव्यवस्थेसाठी त्यांना जबाबदार समजले गेले. गावातील लोकांनी त्यांना गावात प्रवेश करण्यास मनाई केली होती. त्यामुळे मिळेल तिथे त्यामुळे ५३.३३ टक्के बालकांना गावाबाहेर असुरक्षित निवाऱ्यात आसरा घ्यावा लागला.

१९. दुष्काळग्रस्त कुटुंबातील पालकांना मुलांपेक्षा मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न अधिक सतावतो. त्यामुळे ५३.३३ टक्के पालकांना सदैव भिती वाटते.

२०. दुष्काळग्रस्त कुटुंबातील लोकांना दुष्काळाच्या काळात बालकांना आर्थिक सोबतच भविष्याबाबतची चिंता, उपेक्षितपणा असुरक्षा व शाळा सुटण्याची भिती तसेच अनामिक भयग्रस्ततेने पछाडलेले आहे. हि भावना स्थानिक समुदायाने दिलेल्या उपेक्षापुर्ण वागणुकीने निर्माण झाले आहे.

२१. दुष्काळग्रस्त कुटुंबातील लोकांना दुष्काळाच्या काळात बालकांना भोगाव्या लागणाऱ्या त्रासासाठी ९३.३३ टक्के उत्तरदात्यांनी शासनाला जबाबदार मानले आहे.

२२. दुष्काळग्रस्त कुटुंबातील लोकांना दुष्काळाच्या काळात दुष्काळग्रस्तांसाठी असलेल्या कायद्यांचे कुठेही पालन झालेले नाही शिवाय त्यांच्या मानवाधिकारांचेही हनन झाले.

२३. दुष्काळाच्या काळात दुष्काळग्रस्त लोकांना शासनाकडुन अन्न सुरक्षा. प्रवास सुविधा, आर्थिक मदत, वैद्यकीय काळजी मिळाली नाही.

**दुष्काळाचा बालकांवरिल परिणाम कमी करण्यासाठी सुचना आणि समाजकार्य आंतरनिरसन:**

दुष्काळाचा बालकांच्या चार घटकांवर सामान्यपणे परिणाम होतांना दिसतो. सभोवतालचे वातावरण, जीवनमान, सामाजिक स्थिती व भावनिक किंवा मानसिक स्थितीवर. दुष्काळ जरी नैसर्गिक घटकांमुळे निर्माण झाला असला तरी मुले अनेक सोयी सुविधांपासून वंचित होतात. त्यामुळे आलकांच्या जीवनात प्रकारचे धोके निर्माण झालेले आहेत. स्थलांतरण, बदललेली जीवनशैली, शाळेपासून वंचितता, आपुलकीच्या नातेसंबंधांपासून दुरावा, याशिवाय अशाश्वत नैसर्गिक संसाधने, पिण्याचे पाणी, पुरेसे अन्न, देखभाल, कौटुबिंक जिव्हाळा, सुरक्षा यापासुन दुर झाल्याने बालकांच्या नैसर्गिक विकासावर त्याचा नकारात्मक प्रभाव पडला. नवीन स्थितीशी संघर्ष आणि अभावग्रस्ततेमुळे व्यक्तीमत्वही प्रभावित होते.

दुष्काळ समस्या व्यस्थापनाची तयारी करण्याची गरज निर्माण होते. एकात्मिक, सर्वव्यापक, व्यवस्थाबध्द, सहभागात्मक आणि नेटवर्क अभिमुख कार्यनीती तयार करण्याची आवश्यक्ता आहे. दुष्काळ ही गुंतागुंतीची आणि अनेक बाबी समाविष्ट असलेली घटना आहे. यामध्ये शाश्वत शेती, सिंचन, रोजगार, जीवनमान, पर्यावरण, शिक्षण, संस्कार व बालसंगोपन या सर्व घटकांचा संबंध येतो. कारण दुष्काळ या सर्वांवर प्रभाव पाडतो. त्यामुळे नीती तयार करतांना त्याचा विचार व्हायलाच हवा. शिक्षण मुलांना अनेक गोष्टी शिकवते व सशक्तही बनवते. त्यामुळे एकात्मिक राष्ट्रीय दुष्काळ नीती व योजना तयार करणे हे पहिले कार्य आहे. या संबधित टास्कफोर्सने दुष्काळ पिडीतांना यामध्ये सहभागी करून धोके आणि समस्या व्यवस्थापनाला प्राधान्य दिले पाहिजे.

दुष्काळासाठी व्यवस्थापन यंत्रणा तयार करतांना, १. संस्थागत क्षमता बांधणी २. लक्षगटांना आधार देणे ३. एकात्मिक पाणी संसाधन प्रबंधन ४. व्यवस्थाबध्द नियोजन आणि शेती व जीवनपध्दतीचा शाश्वत विकास अशी व्यवस्था करावी लागेल.

दुष्काळाचा विचार करतांना सामाजिक—आर्थिक दुष्काळ, जीवनमानविषयक दुष्काळ, कृषीविषयक दुष्काळ, हवामानशास्त्रीय आणि जल विज्ञानविषयक दुष्काळ अशी वेगवेगळी कारणे दुष्काळाची असतात. याचा बालकांच्या जीवनमानावर, आर्थिक संसाधनांवर, सामाजिक, मानसिक तसेच भावनिक स्थितीवर आणि पर्यावरणावर परिणाम होतो. त्यामुळे हा प्रभाव कमी करण्यासाठी खालील गोष्टी करता येतात.

१. यामध्ये सरकारव्दारे नीतीमध्ये दुष्काळाचे पुर्वानुमान करणे, देखरेख व्यवस्था, प्रभाव मुल्यांकन, प्रतिक्रिया प्राप्त करणे, दुरूस्ती करणे, हवामान परिस्थिती, पाण्याची उपलब्धता, वापर, पुनर्वापर तसेच गैरवापरावर नियंत्रण, संसाधनांचे नियोजन यावर स्थानिक प्रशासनाची जबाबदारी निश्चित करणे इत्यादी गोष्टी कराव्या लागतील.

२. नियोजनकर्त्यांना समर्थ बनविणे, नैसर्गिक संसाधन प्रबंधकाना प्रोत्साहन देणे, अधिक अभ्यासपुर्ण व वेळेवर निर्णय घेण्याची प्रक्रिया गतिमान करणे, हि व्यवस्था निर्माण करण्यासाठी लघु गुंतवणुकदार जसे सधन शेतकरी यांना त्यात सामावुन घेणे इत्यादी प्रक्रियेमुळे दुष्काळग्रस्तांना अधिक लाभ प्राप्त होतो.

३. सामुदायिक पातळीवर दुष्काळामुळे होणारे संसाधनाचे नुकसान रोखण्यासाठी, त्याबाबत जागरूकतेसाठी तशी कार्यनीती आखणे जसे सहकारी शेती, सामुदायिक पाणी वापर इत्यादी.

४. दुष्काळाचे धोके कमी करण्यासाठी व्यवस्थापनात लाभार्थ्यांचे योगदान व सहभाग महत्वाचा असतो.

५. दुष्काळाच्या प्रत्येक घटनांचे प्रलेखन, मुल्यांकन, माहितीचा प्रचार प्रसार करणे आणि दुष्काळानंतरच्या परिस्थितीचे अंकेक्षण करून घेणे आवश्यक असते.

६. वेगवेगळया भागातून आलेल्या दुष्काळग्रस्त स्थलांतरित मुलांची नेमकी आकडेवारी कळण्यासाठी त्यांचा डाटाबेस तयार करण्यासाठी संशोधन करणे आवश्यक आहे.

७. दुष्काळग्रस्त स्थलांतरित मुलांसाठी निती नियोजक व लोकप्रतिनिधींनी त्यांची माहिती, प्रतिक्रिया शासनापर्यंत पोहचविणे, त्यांच्या अधिकारांचे संरक्षण, सेवा सुलभ करणे आणि सुरक्षेचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

८. दुष्काळग्रस्त स्थलांतरित मुलांसाठी स्थानिकामार्फत प्राप्त होणारे संरक्षण नाकारले गेल्याने त्यांचा आधारच गेला. त्यामुळे अशा प्रसंगामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत विशेष सुविधा उपलब्ध करून दिल्या गेल्या पाहिजेत.

९. दुष्काळग्रस्त स्थलांतरित मुलांसाठी असलेल्या कायद्यांचे संरक्षण त्यांना प्राप्त करून देण्याची जबाबदारी महिला व बाल कल्याण विभाग प्रकल्प अधिकारी यांची असते. परंतु या काळात हे अधिकारी त्यांची दखल सुध्दा घेत नाही. ती त्यांनी घ्यावी यासाठी संघटनांनी कार्य करणे आवश्यक आहे.

१०. दुष्काळग्रस्त स्थलांतरित मुलांना आर्थिक सोबतच भविष्याबाबतची चिंता, निराशा व भयग्रस्ततेने पछाडलेले आहे. त्यामुळे स्थानिक समुदायाने त्यांची उपेक्षा न करता त्यांच्याकडे मानवीयतेने पहाणे आवश्यक आहे.

११. दुष्काळग्रस्त स्थलांतरित मुलांमध्ये सर्वाधिक प्रमाण शेतकरी व अनुसुचित जाती व जमातींचे असते. या समुदायासाठी असलेल्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होणे आवश्यक आहे.

१२. दुष्काळग्रस्त कुटुंबासाठी स्थानिक पातळीवरच रोजगाराची सोय झाल्यास त्यांना स्थलांतरित व्हावेच लागणार नाही. त्यासाठी रोजगार हमीची कामे, मनरेगा सारख्या योजनांची यशस्वी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

१३. दुष्काळग्रस्तांसाठी निधी संकलन व मदतीकरीता समाजसेवक, डॉक्टर्स—नर्स, सेवाभावी वकील, दान देणाऱ्या व्यक्ती, प्रसार माध्यमे यांचे नेटवर्क स्थापन करण्याचीही आवश्यकता आहे.

**References :**

1- Wilhite, D.A. and Glantz, M. H.(1985), Understanding the drought phenomenon: The role of definitions. Water International, Vol. 10 pp. 111-120.
2- The Nature of Mass Poverty, Harvard University Press Q 87.
3- Global Report on Food Crisis, 4 May, 2023
4- Mekonnen Yitabarek, (2020), Causes and effects of Drought in Northern Part of Ethiopia, Civil and Environmental Research, Vol. 12, No.3.
5- Tallasksen, L.M.& , (2004),Hydrological Drought, Processes Estimation Methods for Stream flow and groundwater Developments in.
6- Hosseini, S. M. (2009) Causes, Effects and Management Mechanisms of Drought Crisis in Rural and Nomadic Communities in Southeastern Iran as Perceived by Agricultural/Rural Managers and Specialist, Journal of Human Ecology, Vol. 27 pp. 189-200.
7- NIDM (2010), National Disaster Management Guidelines: Management of Drought. National Disaster Authority, Government of India, New Delhi.
8- Siddqui, K.(2015), Agrarian Crisis and Transformation in India, Journal of Economic and Political Economy, Vol. 2(1): pp. 3-22
9- Bazza, M. (2001), Inferences of Drought Mitigation Action Plan, Food and Agriculture Organization of the United Nations -FAO, Regional Office for the Near East Aleppo, Syria27-31 May,2001
10- Nahavandi -Pour M. (2000),Coping with drought , Neday Khamseh Quarterly , Vol.1(1)